# प्रकरण चार

## संबंधित विषयक्षेत्रातील घटकांचा समग्र अभ्यास

४.१ सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमी

४.२ जिल्हा परिषद पातळीवरील शैक्षणिक प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास

४.३ शिक्षण, प्रशासन व शैक्षणिक धोरणांचा अभ्यास

## प्रकरण चार

## संबंधित विषयक्षेत्रातील घटकांचा समग्र अभ्यास

### ४.१] सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमी

१. स्थान – $16^{0}$ ४३' आणि $17^{0}$ ३८' दक्षिण अक्षवृत्त
आणि $43^{0}$ ४१' आणि $75^{0}$ ४१' पूर्व रेखावृत्त.

| | | |
|---|---|---|
| २. | क्षेत्रफळ | – ८५९१.३ चौ. कि.मी. |
| ३. | लोकसंख्या | – १८,३१,२१२ पेक्षा जास्त |
| ४. | तालुके | – खानापूर, शिराळा, वाळवा, तासगांव, जत, कवठे महांकाळ, आटपाडी, मिरज [सांगली] |
| ५. | प्रमुख शहरे | – ६,५३४ खेडी |
| ६. | पाऊस | – ६२ से.मी. |
| ७. | नद्या | – कृष्णा, येरळा, वारणा, माणगंगा |
| ८. | खनिज उत्पादने | – बॉक्साइड |
| ९. | शेती उत्पादने | – भात, गहु, मका, ज्वारी, बाजरी, नाचणी, वाटाणा, वरी, ऊस, द्राक्षे, मिरची, कापूस, भुईमूग, तंबाखू, हळद, आंबे. |
| १०. | बाजारपेठा | – जत, मिरज, सांगली, तासगाव, विटा, आटपाडी, खानापूर |
| ११. | एम.आय.डी.सी-च्या औद्योगिक वसाहती | – सांगली, मिरज, इस्लामपूर, विटा |
| १२. | प्रमुख औद्योगिक उत्पादने | – पंप, शेती, अवजारे, मशिनरी, साखर, हस्तकला, धातूची भांडी, घोंगडी |
| १३. | लोहमार्ग व लांबी | – पुणे-मिरज [ब्रॉडगेज], मिरज-लोंढा [मिटरगेज] मिरज-कुर्डूवाडी [नॅरोगेज], मिरज-कोल्हापूर [ब्रॉडगेज] [१७३ कि.मी.] |

१४. राष्ट्रीय हमरस्ते व क्रमांक - मुंबई-पुणे-कोल्हापूर-४

सांगली हे शहर पटवर्धन संस्थानाची राजधानी म्हणून आजपर्यंत ओळखली जात होती. या शहरात गजाननाचे मंदीर एकमहत्वाचे श्रध्दास्थान आहे.

महाराष्ट्राचे भाग्यधाते पद्मभूषण,सहकारमहर्षी कै. डॉ. वसंतराव दादा पाटील यांची ही संपूर्ण कर्मभूमी आहे.

सांगली हे एक संस्थान होते. स्वातंत्र्यपूर्व काळात राजेशाही पध्दतीत सुध्दा आपल्या मंत्रीमंडळाच्या सहाय्याने राज्य कारभार करणा-या सांगलीचे राजे पटवर्धन होवुन गेले. ते शिक्षण प्रेमी होते. त्यांनीच १८८४ साली सांगलीत "सांगली हायस्कुल" नावाचे पहिले हायस्कुल सुरु केले.

स्वातंत्र्यपुर्व काळात या जिल्हयात सांगली, मिरज, बुधगाव,तासगाव, जत ही संस्थाने होती. त्यामुळे हा जिल्हा जणू संस्थानिकांचाच बनलेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला हा जिल्हा दिनांक १ ऑगस्ट १९४९ रोजी तयार झाला. त्यावेळी या जिल्हयाचे नांव दक्षिण सातारा असे होते. १८ ऑक्टोबर १९६० रोजी हा नविन सांगली जिल्हा तयार झाला.

सांगली शहरामध्ये गणपती मंदीर वस्तुसंग्रहालय कृष्णा नदीवरील आर्यविनपूल,भुईकोट किल्ला,आमराई,प्रतापसिंह उद्यान,प्राणी संग्रहालय,महान राष्ट्र पुरुषांचे पुतळे आणि पश्चिमेकडून वाहणारी कृष्णामाई हे सर्व सांगलीचे वैभव आहे.

येथून ५ कि.मी. अंतरावर हरीपूर येथे कृष्णा-वारणा संगमावर संगमेश्वराचे पुरातन मंदीर आहे. तेथेच बागेत गणपती आहे. तासगाव येथे उजव्या सोंडेचा गणपती असून विविध कला कृतींनी सजविलेला सातमजली गोपूर आहे. कवठे एकंद येथे सिध्दमुनिचे पवित्र मंदिर असून तेथे दस-याविषयी रात्रभर शोभेच्या दारुची रंगीबेरंगी व कलापूर्ण आताषबाजी होते. कृष्णाका ा औदुंबर येथे निसर्गरम्य परिसरात दत्ताचे पवित्र तिर्थस्थान आहे. खानापूर तालुक्यात रेवणसिध्द व शुक्लाचार्यांची जागृत देवस्थाने आहेत. निसर्गरम्य सागरेश्वर अभयारण्य त्यातील पवित्र सागरोषाचे मंदिर उंच शिखर किर्लोस्कर पॉईंट आणि त्यातील स्वैर मृगविहार पाहण्यासाठी सुट्टीच्या दिवशी लोकांची रीघ लागलेली असते. निसर्गरम्य बनाळीतील बनशंकरी देवालय, शिराळयातील नागपंचमी ही पाहण्याजोगी आहे. या जिल्हयामध्ये आठ साखरकारखाने व सुतगिरण्याही आहेत. राजापुरी हळदीची प्रचंड बाजरपेठ द्राक्षे [तासगाव] ही प्रसिध्द आहे.

महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्या राज कारणाला एक नवी दिशा देणारी यशवंत -वसंत जोडी याच जिल्हयाच्या भूमी जन्माला आली.

विधान परिषदेचेच अध्यक्षपद पेललेले कै. वि.स.पागे, महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणाला नवी दिशा देणारे कै. मा. राजारामबापू पाटील यांनी हा जिल्हा नावारुपाला

आपला. त्याचप्रमाणे माजी सहकार मंत्री प्रा. एन.डी. पाटील, शिवाजीराव देशमुख, रामदास आठवले, शेंडगे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात भरीत कामगिरी करुन जिल्हयाचा नावलौकिक वाढविला.

साहित्याच्या क्षेत्रातील कै. ग. दि. माडगुळकर व्यंकटेश माडगुळकर, शंकरराव खरात, नाटककार विष्णपंत भावे कवि काव्य विहारी सुधांशु गिरीष, पी. सावळाराम संजीवनी मराठे नाटककार कृष्णा खाडीलकर गो. ब. देवल. ज्ञानपीठ पारितोषिक मानकरी वि. स. खांडेकर लोकमान्या च्या गितारहस्य टीकाकार यशवंत, डॉ. सरोजनी बाबर, अशोक परांजपे, शंकरराव जावडेकर, रमेश मंत्री, अंधकवी राम गोसावी प्रसिध्द समीस्तक प्रा. भ. द. हातकणंगलेकर या सर्व साहित्यकांनी साहीत्याला भर घालून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अभिनय व आवाजाला व भुरळ पाडणारे बालगंधर्व व मंगेशकर घराणे, विष्णू दिगंबर पलुसकर, अब्दुल करीमखा साहेब यांनीही या क्षेत्रात लौकिक वाढविला

लोकनाटय क्षेत्रात, चित्रसृष्टीत व कुस्तीक्षेत्रातहि हा जिल्हा नेहमीच आघाडीवर आहे.

पारतंत्र्य काळात आंदोलनात भाग घेणारे क्रांतिवीर या भूमीत जन्माला आले आहेत. त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, आण्णासाहेब पत्रावळे, क्रांती अगणी, जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी, वाय. सी. पाटील, हिंदी सिने

क्षेत्रातील भाग्यश्री पटवर्धन,मराठी फिल्मसृष्टीतील विलास रकटे,दिनेश सार्थरे, संगीतकार बाळ पळसुले.

कुस्तिक्षेत्रात भारतभीम जोतीराम दादा सावर्डेकर विष्णूपंत सावर्डेकर,गणपतराव आदळकर,हिंद केसरी मारुती माने हरी नाना पवार, राडे इ. सर्कसक्षेत्रात मिरजेचे छत्रे, तासगावचे माळी व म्हैशाळचे देवल हे प्रसिध्द धन्वंतरीमध्ये डॉ. कोटणीस, डॉ. रणभिसे, डॉ. देवसिकदार, डॉ. विजय शहा यांनी नेत्रदीपक कार्य केलेआहे.

स्वामी रामानंद भारती, बर्डे गुरुजी, पांडु मास्तर, धोंडिराम माळी, नाथाजी लाड इत्यादि.

विजय हजारे, नंदु नाटेकर, भाऊराव पडसलगीकर

| विजय हजारे | नंदु नाटेकर | भाऊराव पडसलगीकर |
|---|---|---|
| क्रिकेट | टेनिस | बुध्दीबळ |

भाग्यश्री साठे, टिपसे,सोनावणे तसेच धन्वंतरी ,व्यवसायातहीहा जिल्हा अग्रेसर आहे.

या जिल्हयातील दै. नवसंदेश, केसरी, अग्रदुत, राष्ट्रशक्ति सांगली दर्शन, ललकार, मतवादी, अतिरेकी, हरीजन सेवक, विजयंता इ. दैनिकांनी व साप्ताहीकांनी लोकजागृतीचे व्रत निरंतरपणे चालु ठेवले आहे.

## शैक्षणिक पार्श्वभूमी :-

आपणास स्वातंत्र्य मिळून ४४ वर्षे झाली आहे. प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महा विद्यालये या सर्वांतुन आपण काय निर्माण करता आहोत ? इंग्रजानी १९४७ सालापूर्वी केले तेच आम्ही शेकडा ८० पेक्षा जास्त "व्हाईट कॉलजर जॉब" ची पैदास करत आहेत.

प्राथमिक शाळा अद्याप सर्वत्र झालेल्या नाहीत. शिक्षक संख्या अपुर्ण, वर्ग खोल्या व इतर साहित्य साधने याचा पुरवठा नाही. यामुळे प्राथमिक शाळेतच गळती होते. व पुढील शिक्षणापासून वंचित रहातात.[3] या जिल्हयाचा शैक्षणिकदृष्टया विचार केला तर १९१९-२० साली १३८ शाळा व ७,९९३ विद्यार्थी होते. १ खाजगी महाविद्यालय व २ माध्यमिक शाळा, अँग्लो व्हर्नाक्युलर स्कुल्स ५, कन्याशाळा १०, सस्कूल शाळा ५, रात्रशाळा, व्हर्नाकुयलर खाजगी १५ लो कास्ट स्कुल ५ अशी संख्या होती.

१९२९-३० साली १६६ गव्हर्मेंट प्रायमरी स्कुल मध्ये ११८७५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शासकीय इतर शिक्षण संख्या मध्ये २९ शाळामध्ये २,३०९ विद्यार्थी शिकत होते.

माध्यमिक शाळामध्ये सिटी हायस्कुल व सांगली हायस्कुल व इतर दोन अशी ४ हायस्कुल होती.

१९४२ साली शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु झाले. वुईमेन्स एज्युकेशन सोसायटीने १९४४-४६ मध्ये श्रीमंत विजयसिंह मॉन्टेसरी स्कुल, इगर्ल्स हायस्कुल चालु झाले. तदनंतर महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी पुणे या संस्थेचे इंजिनिअरींग कॉलेज व ख्रिचनीय वालचंद कॉलेज सुरु झाले. पाश्चात्य शिक्षण धर्तीवर वुईमेन्स व सांगली एज्युकेशन सोसायटीने वेगळया शाळा सुरु केल्या. [१८८४]

आज सांगली जिल्हयाच्या बाबतीत विचार केल्यास प्राथमिक शिक्षणाची स्थिती फारशी समाधान कारक आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. जिल्हयामध्ये प्राथमिक शाळा खाजगी स्वरुपातील अत्यल्प आहेत. याशिवाय सांगली, मिरज, तासगाव, विटा या शहरात नगरपालिकेकडे प्राथमिक वर्ग आहेत. बाकी सर्वच ठिकाणी जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली प्राथमिक शिक्षण इ. १ ली ते ७ वी पर्यंत चालते. जून ९६ पासून प्राथमिक श शाळांनाच आठवी इयत्तेचे वर्ग जोडले जात आहेत.

सामान्य शिक्षण -

पुर्वी सांगली जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी वर्ग -१ मधील एक व वर्ग दोन मधील २ याशिवाय २० असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल, इनस्पेक्टर [अे.डी.आय.] होते.

जिल्हा स्कुल बोर्डामध्ये चेअरमन, व्हा.चेअरमन आणि प्रत्यक्ष निवडून आलेले व स्विकृत असे १४ सदस्य असत. सचिव म्हणून शिक्षणाधिकार काम पहात.

प्राथमिक शिक्षण कायदा १९४७ अन्वये स्टाफ सिलेक्शन कमिटीचे चार प्रशासन अधिकारीअसून त्यांना शिक्षण नेमणुका, बदली, प्रशिक्षण इत्यादि अधिकार व जबाबदाऱ्या असत.[४.]

प्राथमिक शिक्षणापासून पदवी परीक्षेपर्यंत किती विद्यार्थी पोहचतात याचा विचार केल्यास इयत्ता १ ली ते

५ वी पर्यंत ४८ टक्के विद्यार्थी गळती, सातवीपर्यंत ३१ टक्के १० वीपर्यंत १८ टक्के गळती.

उरलेल्या ३ टक्के मध्ये १० वी व १२ वी मध्ये दीड टक्के गळतात. व दीड टक्के पदवीपर्यंत शिकतात व पास होतात. शेवटी पदवीनंतरही सर्वांनाच जॉब मिळतो असे नाही. असे भयावह चित्र आज आपणास दिसून येते आहे.[५]

ग्रामीण शिक्षणाच्या बाबतीतले काही महत्वाचे अडथळेच, या भागाचा विकास न होणेस कारणीभूत ठरले आहेत. असे म्हटले तर मुळीच वावगे ठरू नये. लहान मलांना कोणत्या प्रकारे शिक्षण दिले जाते आणि मुळात ते त्यांना घ्यावेसे वाटावे असे वातावरण ग्रामीण भागात असते का या मुद्यांचा गांर्भियाने विचार करण्याची वेळ आली आहे. ग्रामिण भागातील शिक्षणाच्या अवस्थेचा विचार करताना पुढील घटकांचा विचार अपरिहार्यपणे करावा लागतो.

१. ग्रामीण भागातील शाळांची अवस्था व वातावरण लहान मुलांना शिक्षण घ्यावेसे वाटावे, अशी असते काय ?

२. ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणासाठी पुरेशा बालवाडया प्राथमिक शाळा किंवा शिक्षणकेंद्रे उपलब्ध आहेत का ?

३. शाळा वातावरण व सुविधा जेथे चांगल्या आहेत तेथे शिक्षणकार्य व्यवस्थित चालु आहे का ?

दुर्दैवाने आतापर्यंत तरी या सर्व घटकांचा विचार

करताना नकारार्थी उत्तरेच जास्त मिळण्याची शक्यता आहे.

कित्येक छोटया गावात वाडी,वस्तीवर अद्याप शाळा नाहीत जेथे आहेत तेथे त्यांच्या इमारती, अंतर्गत सुविधा बैठकव्यवस्था नाही. एकंदरीत आपण राज्याचा विचार केला तर महाराष्ट्र राज्यात एकूण ५९ हजार २८९ प्राथमिक शाळा आहेत. महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण ६४.८७ टक्के आहे. त्या महिला साक्षरतेचे प्रमाण राज्यात ५२.३० टक्के इतके आहे. महाराष्ट्र राज्यात प्राथमिक शिक्षण घेणा-या मुलांची पटावर नोंदली गेलेली संख्या सुमारे १ कोटी ४० लाख इतकी आहे. त्यांना शिकविणा-या शिक्षकांची संख्या २ लाख ८२ हजार २०४ आहे. म्हणजे ५०ते ६० मुलामध्ये १ शिक्षक असे प्रमाण दिसते.

प्राथमिक शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढविणे व शिक्षणाचे सार्वत्रीकरण करणे ही दोन प्रमुख उद्दिष्टे आहेत.

आज महाराष्ट्रात पहिली इयत्तेतदाखल होणा-या १०० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी ४ थी पर्यंत गळतात, आणि सुमारे ५३ विद्यार्थी ७ वी पर्यंत गळतात. मुलींचे प्रमाण ४ थीपर्यंत ३५, ७ वी पर्यंत ५८ असे आहे.[६]